इकरा शिक्षण संस्था, ता.जि.जळगांव संचलित इकरा उर्दू माध्यमिक शाळा, प्रतापनगर, वॉर्ड क्र.२३, जि.जळगांव शाळेचे अजिंठा चौफुलीजवळ, लड्ढा फार्म हाऊस मागे, प्लॉट नं.८२, सालार नगर, जि.जळगांव येथे केलेल्या स्थलांतरास कार्योत्तर मान्यतेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः माशास्थ ३३१८/प्र.क्र.४१०/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २० सप्टेंबर, २०१९

वाचा :-

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांकः माशास्थ २०१२/(५९/१२)माशि-२, दिनांक ३१ जुलै, २०१३.

संदर्भ :- विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांचे क्र.शिउसं/नावि/माध्य-३/ स्थलांतर/२०१७/२४०९/११, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

इकरा शिक्षण संस्था, ता.जि.जळगांव संचलित इकरा उर्दू माध्यमिक शाळा, प्रतापनगर, वॉर्ड क्र.२३, जि.जळगांव या उर्दू माध्यमाच्या उच्च प्राथमिक व माध्यमिक (इयत्ता ५ वी ते १० वी) शाळेचे, अजिंठा चौफुलीजवळ, लड्ढा फार्म हाऊस मागे, प्लॉट नं.८२, सालार नगर, जि.जळगांव येथील स्थलांतरास कार्योत्तर मान्यता देण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

उपरोक्त शाळेचे, भाडयाच्या व अपुऱ्या भौतिक सुविधा असलेल्या इमारतीतून भौतिक सुविधा असलेल्या संस्थेच्या मालकीच्या इमारतीमध्ये स्थलांतर प्रस्तावित केले आहे. सदर शाळेचे वर नमूद ठिकाणी केलेल्या स्थलांतरास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे. :-

(१) स्थलांतर शुल्क रू.१०,०००/- भरणे आवश्यक राहील.

(२) स्थलांतरीत शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.

(३) स्थलांतरापूर्वी कार्यरत असलेल्या अर्हताप्राप्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना स्थलांतरित ठिकाणी समायोजित करून घेण्यात आले आहे व स्थलांतराबाबत त्यांची काहीही तक्रार/ आक्षेप नाहीत, याबाबत संस्थेच्या अध्यक्ष/ सचिवांचे रू.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(४) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार व याबाबत शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशानुसार स्थलांतराच्या ठिकाणी शाळेसाठी पक्की इमारत व सर्व भौतिक सुविधा आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, याबाबत संस्थेच्या अध्यक्ष/ सचिवांचे रू.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(५) शासनाकडून शाळा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ.संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ.चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.

(६) स्थलांतरीत शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.

(७) स्थलांतरीत शाळेच्या बाबतीत मुळ शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाहीत.

(८) सदर शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर कार्यरत होती, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी कार्यरत राहील.

(९) शाळेचे यापुढे शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय स्थलांतर करण्यात येणार नाही, याबाबत दक्षता घेण्याबाबत संस्थेस स्पष्ट करण्यात यावे.

(१०) सदरहू स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. वरील अट क्रमांक (१) ची पूर्तता झाल्यावर, विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांनी सदर शाळेच्या स्थलांतरास मान्यता देण्याबाबत ४ आठवडयात पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२०२१०६३०४९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.09.21 09:41:46 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत –

१) शिक्षण संचालक (प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक
३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव
४) अध्यक्ष/ सचिव, इकरा शिक्षण संस्था, ता.जि.जळगांव
५) निवडनस्ती (एसएम-१).